ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारत – बांग्लादेश संबंध

**डॉ. एस.पी. वेल्हाळ**
*गोगटे वाळके कॉलेज, बांदा*
*जि. सिंधुदुर्ग*

प्रस्तावना-

भारत हा दक्षिण आशियातील आकारमान, लोकसंख्या, अर्थव्यवस्था, लष्करी क्षमता, तांत्रिक प्रगती, राजकीय प्रगती आणि शासकीय अशा सर्वच बाबतीत चीन वगळता इतर शेजारी देशांपेक्षा मोठा आहे. स्वातंत्र्यानंतर भारताकडे एक बलाढ्य राष्ट्र म्हणून पहिले जावू लागले. आशियायी देशात भारताचे स्थान मध्यवर्ती आहे. संपूर्ण जगाला जोडणारे व्यापारी मार्ग भारताच्या वायव्य आणि ईशान्य भागातून जात होते.

१९४७ मध्ये भारत आणि पाकिस्तान हे परस्पर विरोधी गुणधर्म असलेले दोन देश निर्माण झाले. त्यामुळे हिंसाचार, संघर्ष वाढीस लागला. १९७१ मध्ये पाकिस्तानचे विभाजन होऊन बांग्लादेशची निर्मिती झाली. बंगाली लोकांच्या चळवळीस भारताने पाठिंबा दिला, लष्करी मदत पुरविली. या काळात पंडित नेहरूनी विकसनशील जगात भारताचा दबदबा निर्माण केला होता. परंतु द. आशियातील सर्व शेजारी राष्ट्रांमध्ये परस्पर विश्वास नसल्यामुळे या देशांमध्ये व्यापार वाढू शकला नाही. तसेच शैक्षणिक, सांस्कृतिक, शास्त्रीय आणि तांत्रिक क्षेत्रात प्रगती झाली नाही. प्रत्येक देशाने जगभर आपले संबंध वाढवण्याचा प्रयत्न केला. विविध राष्ट्रांशी अनेक करार केले. शीतयुद्धाच्या काळात काहींनी अमेरिकेची तर काहींनी रशियाची बाजू घेतली. यामुळे दक्षिण आशियाचे राजकारण अशांत, अस्थिर आणि सर्वांच्याच प्रगतीला मारक ठरणारे झाले.

भारताने सर्वात बलाढ्य राष्ट्र म्हणून दक्षिण आशियातील सर्व छोट्या राष्ट्रांच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारली पाहिजे तसेच बाहेरच्या शक्ती दक्षिण आशियाच्या राजकरणात हस्तक्षेप करणार नाहीत हे पहिले पाहिजे. या पार्श्वभूमीचा विचार करुन प्रस्तुत निबंधात भारत – बांग्लादेश यांच्यातील संबंधाचा आढावा घेतला आहे.

**भारत – बांग्लादेश संबंध:**

भारतीय उपखंडातील तीन शेजारी देश – भारताची फाळणी होऊन १९४७ साली पाकिस्तानची निर्मिती झाली आणि पाकिस्तानचे विभाजन होऊन १९७१ साली बांग्लादेशची स्थापना झाली. बांग्लादेशची लोकसंख्या १६.९ कोटी असून मुस्लिम ९०.४%, हिंदू ८.२% व इतर १.४% आहे. त्यांचे क्षेत्रफळ १, ४७, ५७० चौ. कि.मी. आहे.

**बांगलादेशाच्या निर्मितीचा इतिहास:**

बांग्लादेशच्या निर्मितीमध्ये भारताने महत्वाची आणि निर्णायक भूमिका बजावली. पाकिस्तानची निर्मिती धर्माच्या आधारावर झाली. महंमद अली जिना यांनी ब्रिटीश भारतातील मुस्लीम बहुसंख्य भागांचे वेगळे राज्य निर्माण करण्याची मागणी केली. १९४० नंतर या मागणीने जोर धरला. ब्रिटीशांनी महात्मा गांधीसारख्या अनेक भारतीय नेत्यांचा विरोध डावलून ही मागणी मान्य केली. आजचा पाकिस्तान आणि बांग्लादेश या दोन्ही प्रदेशांचा मिळून पाकिस्तान हा देश निर्माण झाला. त्या भागांना अनुक्रमे पश्चिम आणि पूर्व पाकिस्तान म्हटले जात होते. केवळ धर्माच्या पलिकडे दोन्ही भागांमध्ये कोणतेही साम्य नव्हते. दोन्ही भागांचा भूगोल वेगळा – पश्चिम पाकिस्तानचा बराचसा भाग समुद्रसपाटी पासून फार थोड्या उंचीवर – सखल प्रदेश – पद्मा नदीचा (भारतातील गंगेचा) आणि जमुनेचा (भारतातील ब्रम्हपुत्रा) मिश्र प्रदेश. पश्चिम पाकिस्तानात पंजाबी, सिंधी, बलुची, उर्दू या भाषा बोलल्या जात होत्या तर पूर्व पाकिस्तान मध्ये बंगाली. दोन्ही प्रदेशातील खानपानाच्या सवयी, कपडे आणि एकूणच संस्कृती वेगळी. या सगळ्या घटकांमुळे दोन्ही प्रदेशांचे धर्म एक असूनही फारसे जमेना. सत्ता सगळी पश्चिम पाकिस्तानच्या नेत्यांच्या हाती एकवटली होती. बंगाली लोकांना सत्तेमध्ये योग्य वाटा मिळाला नाही. निर्णय सगळे पश्चिम पाकिस्तानात घेतले जात. पूर्व पाकिस्तानात केवळ अंमलबजावणी होत असे. पूर्व पाकिस्तानमधील संसाधनांचा पश्चिम पाकिस्तानच्या विकासासाठी वापर होऊ लागला. थोडक्यात पश्चिम पाकिस्तानकडून पूर्व पाकिस्तानचे म्हणजेच बंगाली लोकांचे शोषण होऊ लागले. बंगाली लोकांच्या दृष्टीने पाकिस्तान मध्ये सामील होऊन काहीच बादल झाला

नाही. फक्त शोषण करता बदलला. ब्रिटीशांची जागा पश्चिम पाकिस्तानमधील नेत्यांनी घेतली. शोषण तसेच चालू राहिले.

कालांतराने शेख मुजीबुर रेहमान यांच्या नेतृत्वाखालील आवामी लीग या पक्षाच्या आणि मुक्ती वाहिनी या संघटनेच्या माध्यमातून बंगाली लोकांची स्वातंत्र्यासाठीची चळवळ उभी राहिली. २६ मार्च १९७१ रोजी बांग्लादेशचे स्वातंत्र्य घोषित करण्यात आले. पाकिस्तानी सरकारने चळवळ दडपण्याचा प्रयत्न केला. सामान्य जनतेवर अत्याचार झाले. पाकिस्तानच्या लष्कराने चळवळ दडपण्यासाठी मोठी मोहीम आखली. हत्याकांड घडवून आणण्यात आले. यामध्ये काही संघटनांच्या दाव्याप्रमाणे ३० लाखाच्या आसपास लोक मारले गेले, दोन लाखाहून अधिक स्त्रियांवर बलात्कार झाले. अनेक लोक बेघर झाले. जीवाला घाबरून लोक बेकायदेशीरपणे भारतामध्ये आश्रय घेऊ लागले. भारतातील निर्वासितांची संख्या लाखाच्या वर गेली.

आंतरराष्ट्रीय समुदायाला विश्वासात घेऊन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी पाकिस्तानच्या या प्रश्नात हस्तक्षेप करण्याचा निर्णय घेतला. रॉ - (*Research And Analysis Wing – RAW)* या भारतीय गुप्तचर संस्थेने आणि भारतीय लष्कराने मुक्ती वाहिनीला मदत केली आणि चळवळ यशस्वी झाली. १९७१ मध्ये स्वतंत्र बांग्लादेशची स्थापना झाली. या संघर्षात अमेरिकेने आपली अणुउर्जेवर चालणारी एंटरप्राइज ही मोठी बोट पाठवून पाकिस्तानच्या बाजूने भारतावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. परंतु सोव्हिएट रशियाने त्याला तोडीस तोड उत्तर देत आपली तितक्याच ताकदीची बोट पाठवण्याची तयारी सुरू केली. त्याचा परिणाम म्हणून अमेरिकेने माघार घेतली आणि बंगाली चळवळीचा विजय निश्चित झाला. भारतीय उपखंडामध्ये महासत्तांचा किती हस्तक्षेप होता हे यावरून सिद्ध होते.

भारताच्या या हस्तक्षेपामुळे बंगाली लोकांना स्वातंत्र्य मिळाले, भारताच्या परराष्ट्र धोरणाच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवावे असे काही तरी घडले परंतु पाकिस्तानच्या मनात त्याचे सल आजही आहे. आयएसआय आणि पाकिस्तानी लष्कराने तेव्हापासून भारताचे असेच तुकडे करण्याचे ठरवले आहे असा दावा अनेकजण करतात. पंजाब आणि काश्मीरमध्ये ते दहशतवाद्यांना देत असलेला पाठिंब, भारतातील खोट्या नोटांचा सुळसुळाटए पंजाबमधील मादक द्रव्यांचा वाढता प्रसार हा त्याचाच पुरावा आहे असे मानले जाते.

**बांग्लादेश निर्मितीनंतरचा काळ:**

बांग्लादेशच्या निर्मितीनंतर काही काळ भारताचे आणि बांग्लादेशचे संबंध मित्रत्वाचे राहिले, शेख मुजीबुर रेहमान हे स्वातंत्र्य चळवळीचे नेते बांग्लादेशचे पहिले अध्यक्ष झाले. आवामी लीग या १९४९ साली स्थापन झालेल्या पक्षाचे ते नेते आणि संस्थापक सदस्य होते. राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही आणि समाजवाद ही तत्वे बांग्लादेशची आधारभूत तत्वे मानली गेली. १९७२ च्या घटनेमध्ये तशी नोंद करण्यात आली. हे सर्व भारतीय घटनेशी मिळतेजुळते होते. परंतु १९७५ मध्ये लष्करी उठावात शेख मुजीबुर रेहमान यांची आणि त्यांच्या कुटुंबातील बऱ्याच सदस्यांची हत्या झाली. त्यानंतर सत्तेमध्ये आलेले नवे नेतृत्व भारताला फारसे मानवणारे नव्हते. त्यामुळे भारत आणि बांग्लादेशाचे संबंध बिघडत गेले.

शीतयुद्धाचाही या संबंधावर परिणाम झाला. दोन्ही देशांनी शीतयुद्धादरम्यान परस्परविरोधी भूमिका घेतल्या. पुढे बांग्लादेश १९६९ साली स्थापन झालेल्या इस्लामिक देशांच्या इस्लामिक सहकार्य संघटनेत सामील झाला – (*Organisation of Islamic Cooperation IOC ).* भारतानेही १९६९ सालापासून या संघटनेत सामील होण्याचा प्रयत्न केला होता. परंतु पाकिस्तानच्या विरोधामुळे आजपर्यंत ते शक्य झालेले नाही. पाकिस्तानात किंवा बांगलादेशमध्ये आहे इतकीच किंबहुना त्यापेक्षा जास्त मुस्लिम लोकसंख्या भारतात आहे. मार्च २०१९ मध्ये भारताच्या परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांनी या संघटनेच्या दुबई येथील परराष्ट्र मंत्र्यांच्या अधिवेशनात खास आमंत्रित पाहुणे म्हणून भाग घेतला. त्यावेळीही पाकिस्तानने विरोध केला. पाकिस्तानच्या विरोधाला डावलून भारताचे आमंत्रण कायम ठेवण्यात आले. त्याचा निषेध म्हणून पाकिस्तानने या बैठकीवर बहिष्कार टाकला. बांग्लादेशच्या या संघटनेतील सदस्यत्वामुळेही भारत बांग्लादेश संबंधामध्ये काही प्रमाणात कटुता निर्माण झाली.

**आजचा बांग्लादेश:**

शेख हसीना या बांग्लादेशच्या सध्याच्या (२०१९) पंतप्रधान तर अब्दुल हमीद हे अध्यक्ष आहेत. शेख हसीना ह्या शेख मुजीबुर रेहमान यांच्या कन्या. घटनात्मक लोकशाही आणि एकात्म गणतंत्र असलेला,

लिखित घटना असलेला हा देश. साधारण सोळा कोटी इतकी लोकसंख्या आणि १, ४७, ५७० चौ. किमी. इतके क्षेत्र महाराष्ट्राच्या जवळपास निम्मे आकारमान – लोकसंख्या मात्र महाराष्ट्रापेक्षा जवळपास पाच कोटींनी अधिक त्यामुळे लोकसंख्येची घनता प्रचंड आहे – १००० प्रति चौ. किमी. हून अधिक. दारिद्र्य बेरोजगारी, आरोग्य आणि शिक्षण सुविधांचा अभाव हे येथील प्रमुख प्रश्न. अलिकडे मूलतत्ववादाचा प्राशनही भेडसावतो आहे. परंतु गेल्या दहा वर्षांत ह्या सर्व प्रश्नांवर मात करून बांग्लादेशाने काही प्रमाणात प्रगती साध्य केली आहे. तसे जागतिक बँकेच्या ऑक्टोबर – २०१९ मधील एका अहवालात नमूद करण्यात आले आहे.

**भारत – बांग्लादेश सीमा:**

भारत बांग्लादेश सीमा चार हजाराहुन अधिक किलोमीटर्स लांबीची आहे. जगातील पाचवी मोठी आंतरराष्ट्रीय सीमा. आसाम, त्रिपुरा, मिझोराम, मेघालय आणि पश्चिम बंगाल अशा भारतातील पाच राज्यांना ही सीमा भिडते. १९४७ मध्ये रॅडक्लिफ या ब्रिटिश अधिकाऱ्याने पाकिस्तानची निर्मिती करताना प्रथम ती सीमा ठरवली. त्यामुळे तिला रॅडक्लिफ लाइन असे म्हणतात. कोणतीही सामाजिक, ऐतिहासिक, राजकीय आणि आर्थिक पार्श्वभूमी न तपासता, मनमानी पद्धतीने ह्या सीमेबद्दलचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अनेक संघर्ष, वाद निर्माण झाले, हिंसाचार झाला. खुलना हा प्रदेश भारतात येईल असे १९४७ मध्ये लोकांना वाटत होते. तिथे तिरंगा झेंडा फडकवला गेला. पण अचानक खुलना पाकिस्तानमध्ये गेल्याचे जाहीर करण्यात आले. त्यामुळे नागरिकांची मोठी पंचाईत झाली. बांग्लादेशची निर्मिती करताना तीच सीमा कायम राहिली. पाकिस्तान बरोबर सीमेचे कोणतेच वाद सुटले नव्हते. ते बांगलादेशची निर्मिती झाल्यानंतरही कायम राहिले. या सीमेच्या प्रश्नामुळे बौद्ध धर्म मानणाऱ्या चकमा जमातीच्या लोकांना पुष्कळ त्रास सहन करावे लागले. मुस्लिम बहुसंख्य भागात त्यांना राहावे लागले. अनेक संघर्षांना तोंड द्यावे लागले. अनेकांना भारतात निर्वासित म्हणून यावे लागले.

जमिनीबरोबर समुद्री सीमेसंबंधी वाद होते. बंगालच्या उपसागरात कोणते क्षेत्र कुणाचे यासंबंधी हे वाद होते. १९७४ ते २००९ पर्यंत चर्चेच्या आठ फेऱ्या झाल्या. वाद सुटला नाही. शेवटी बांगलादेशने हे प्रकरण आंतरराष्ट्रीय न्यायालयात नेले. संयुक्त राष्ट्रांनी सागरसंबंधीच्या कायद्यांबद्दल करार केला आहे – *UN Convention on the Law of the Sea ( UNCLOS )* – त्यानुसार बांग्लादेशाने वाद सोडविण्यासाठी अर्ज केला. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने २०१४ मध्ये यासंबंधीचा निर्णय दिला. तो दोन्ही राष्ट्रांनी मान्य केल्यामुळे हा वाद संपला. वाद मिटायला ४० वर्षे लागली.

**चिकन्स नेक – सिलीगुडी कॉरिडॉरचा प्रश्नः**

भारताचा उजवीकडील प्रदेश म्हणजे ईशान्येकडील सात राज्ये – आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, मिझोराम, त्रिपुरा, नागालँड, मणीपुर. बांग्लादेशची भूमी मध्ये असल्यामुळे ईशान्येकडील राज्यांशी संपर्क साधण्यासाठी पश्चिम बंगाल आणि ईशान्येकडील राज्यांना जोडणाऱ्या सिलीगुडी कॉरीडॉरवर भारताला मुख्यतः अवलंबून राहावे लागते आहे. सिलीगुडी कॉरीडॉर हा 60 किमी लांबीचा चिंचोळा भाग आहे. या प्रदेशाची कमीतकमी रुंदी काही ठिकाणी फक्त २२ किमी इतकी कमी आहे. यामुळे भारताला दळणवळणाच्या बाबतीत अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. कोलकात्याहून आगरताळयाला – त्रिपुरामध्ये जायचे असल्यास सिलीगुडी कॉरीडॉरमधून मोठा वळसा घालून जावे लागते. बांग्लादेशच्या भूमीमधून जवळचा रस्ता आहे परंतु बांग्लादेशाने परवानगी नाकारली असल्यामुळे त्याचा वापर करता येत नाही.

अलिकडेच म्हणजे २०१८ साली कोलकाता – ढाका – आगरताळा बस सेवा सुरू करण्यात आली आहे. ही अशाप्रकारची दुसरी बस सेवा आहे. त्यामुळे या परिस्थितीत थोडा अनुकूल बदल झालेला आहे. बांग्लादेशातून हा प्रवास ५१५ किमी. चा होतो. परंतु भारतातून सिलीगुडीमधून गेल्यास हे अंतर १६५० किमी. चे होते.

**भारत – बांग्लादेश सीमा करार, 2015:**

जून २०१५ मध्ये भारत आणि बांग्लादेशच्या सरकारांनी भुसीमेसंधर्भात करार केला आणि भारत – बांग्लादेश सीमा प्रश्न निकालात काढला. 100 व्या घटना दुरुस्तीने या करारातील तरतुदींचा भारतीय राज्यघटनेत समावेश करण्यात आला आहे. या करारानुसार नागरिकांची आणि प्रदेशांची अदलाबदल आणि देवाणघेवाण करण्यात आली. साधारणतः जे प्रदेश भारताच्या सीमेला लागून आहेत ते भारतात सामील करण्यात आले. तेथील नागरिकांना हवे ते नागरिकत्व एका विशिष्ट मुदतीत स्वीकारण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले. हा प्रश्न सहमतीने सुटल्यामुळे

दोन्ही देशातील संघर्षाचे प्रमुख कारण संपले आहे. १९७४ मध्ये पहिल्यांदा असा करार करण्यात आला होता. पंतप्रधान इंदिरा गांधी आणि बांग्लादेशचे पंतप्रधान शेख मुजीबुर रेहमान यांच्यामध्ये हा करार झाला परंतु त्यामध्ये एकमेकांच्या भूमीची देवाणघेवाण अपेक्षित असल्याने दोन्ही देशांच्या संसदेची त्याला मान्यता असणे आवश्यक आहे. बांग्लादेशच्या संसदेने १९७४ सालीच या कराराला मान्यता दिली. २०१५ साली भारतीय संसदेने त्याला मान्यता दिली.

यामध्ये १६२ परीक्षेत्रांचे चीटमहालांचे अदानप्रदान अपेक्षित होते. भारताने १११ चीटमहाल बांग्लादेशाला द्यायचे आणि बांग्लादेशने ५१ चीटमहाल भारताला द्यायचे. चीटमहाल हा बंगाली भाषेतील शब्द आहे. चीट म्हणजे तुकडा आणि महाल म्हणजे जमीन – चीटमहाल म्हणजे जमिनीचा तुकडा. भारत बांग्लादेश सीमेवरील अशा १६२ तुकड्यांचे अदानप्रदान या करारात नोंदवलेले आहे. हे तुकडे ब्रिटीश काळात कूचबिहार आणि रंगपूर या संस्थानांमध्ये होते. स्वातंत्र्यानंतर या दोन्ही संस्थानांनी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. या दोन्ही संस्थानांनी लढाया करून एकमेकांचे अनेक छोटे प्रदेश ताब्यात घेतले होते. १९५२ साली कूचबिहार भारतात – पश्चिम बंगाल राज्यात सामील झाले आणि रंगपूर बांग्लादेशमध्ये सामील झाले. त्यामुळे भारताच्या भूमीमध्ये बांग्लादेशची भूमी आणि त्यामध्ये परत भारताचा काही भाग किंवा बांग्लादेशच्या भूमीमध्ये भारताची भूमी आणि त्यामध्ये काही भाग बांग्लादेशचा अशी विचित्र परिस्थिती निर्माण झाली.

या सर्व चीटमहालांमध्ये मिळून ५०,००० च्या वर लोक राहत होते. त्यांना कुठल्याही देशाचे धड नागरिकत्व नव्हते आणि त्याच्याकडे दोन्हीपैकी कोणताच देश लक्ष देत नव्हता. हे सर्व प्रश्न ह्या करारामुळे एकदाचे निकालात निघाले. प्रदेशच्या बाबतीत भारताचे नुकसान झाले आहे. अधिक प्रदेश बांग्लादेश मध्ये सामील झाला. परंतु त्याला इलाज नव्हता. प्रत्यक्षात जो प्रदेश बांग्लादेशमध्ये गेला त्या प्रदेशावर नियंत्रण करणे किंवा प्रशासन चालवणे भारताच्या दृष्टीने भौगोलिक दृष्ट्या जवळपास अशक्य होते.

जो प्रदेश भारतामध्ये आला आहे त्यासाठी आणि तेथील जनतेसाठी भारताच्या केंद्र सरकारने काही हजार कोटींचा निधी मंजूर केला आहे. पश्चिम बंगाल सरकारच्या माध्यमातून विविध योजना राबवून या भागातील जनतेचा विकास करण्याचा प्रयत्न चालू आहे. २०१६ साली राज्यविधानसभेच्या निवडणुकीत यापैकी ज्यांना नागरिकत्व मिळाले आहे त्या सर्वांनी मतदानाचा आपला हक्क पहिल्यांदाच बजावला.

**फराक्का बॅराजसंबंधीचा वाद:**

पश्चिम बंगालच्या मुर्शिदाबाद जिल्ह्यात भारत बांग्लादेश सीमेपासून अंदाजे १६.५ किमी. अंतरावर गंगा नदीवर १९६१ ते १९७२ या अकरा वर्षाच्या काळात हे बॅराज बांधण्यात आले. गंगा नदीच्या एका प्रवाहातून बांग्लादेशमध्ये जाणारे अतिरिक्त पाणी हुगली नदीतून कोलकाता बंदराकडे वळवण्यासाठी हे बॅराज बांधण्यात आले. याला १०९ दरवाजे आहेत. धरण आणि बॅराज या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. धरण पाणी साठवण्यासाठी बांधले जाते टीआर बॅराज पाणी वळवण्यासाठी बांधले जाते. फराक्का बॅराजमुळे कोलकाता बंदरामध्ये अधिक पाणी जाऊ लागले. त्यामुळे तेथील जहाजांचे अवागमन वाढले. व्यापार वाढला. अतिरिक्त पाणी भारतातील प्रदेशाला मिळाले. पिण्याच्या पाण्याची सोय झाली. परंतु बांग्लादेशला मिळणारे पाणी ह्या बॅराजमुळे कमी झाले. त्यामुळे अगदी सुरुवातीपासून बांग्लादेशचा या बॅराजला विरोध होता. अलिकडे बिहारच्या मुख्यमंत्र्यांनीही या बॅराजला विरोध केला आहे. त्यांच्या मते या बॅराजमुळेच बिहार मधील पुराचे प्रमाण वाढले आहे. अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय तक्रारी लक्षात घेऊन भारत सरकार या बॅराजच्या रचनेमध्ये काही बदल करण्याचा विचार करत आहे.

**बांग्लादेश – भारत सीमेवरील कुंपण वाद:**

बांग्लादेशच्या सीमेवर भारत सरकारने काटेरी तारांचे कुंपण बांधले आहे. बांग्लादेशातून अवैध मार्गाने भारतात येणाऱ्या बांग्लादेशी नागरिकांना रोखण्यासाठी हा उपाय करण्यात आला. बांग्लादेशचा याला पहिल्यापासून विरोध राहिला आहे. या सीमेवर शस्त्रात्रे, मादक द्रव्य, नकली नोटा आणि माणसांची तस्करी होते, दहशतवादी आणि गुन्हेगारी प्रवृत्तीच्या माणसांची आवक जावक होते. मार्च २०१९ मध्ये व्यापक एकीकृत सीमा व्यवस्थापन प्रणाली (*Comprehensive Integrated Border Management System – CIBMS)* अंतर्गत भारत बांग्लादेश सीमेवर ६१ किमी लांबीचे 'स्मार्ट' कुंपण उभे करण्यात आले आहे.

**तीन बिघा कॉरिडॉरचा प्रश्न:**

तीन बिघा हा पश्चिम बंगालमधील जमिनीचा पट्टा आहे. या पट्ट्यामधून बांग्लादेशच्या दहाग्राम अंगरपोटा या

चीटमहालाला (*enclace)* जाणारा रस्ता जातो. बांग्लादेशला या चीटमहालाकडे जाणारा मार्ग मिळवा म्हणून हा तीन बिघाचा पट्टा बांग्लादेशाला देण्याचा आणि त्याबदल्यात बांग्लादेशमधील दक्षिण बेरुबारी हा एक छोटा जमिनीचा पट्टा भरताला देण्याचे १९७४ साली झालेल्या इंदिरा – मुजीब करारांतर्गत ठरले. त्यानुसार बांग्लादेशने भारताला ठरलेला पट्टा दिला. परंतु भारताने तीन बिघाची मालकी बांग्लादेशला दिली नाही. शेवटी सप्टेंबर २०११ मध्ये हा पट्टा बांग्लादेशला भाडेपट्टीवर देण्यात आला.

**न्यू मुर किंवा पुरबाशा बेटाचा प्रश्न:**

न्यू मुर हे भारताने ह्या बेटाला दिलेले नाव. बांग्लादेशाने याला दक्षिण तलापट्टी हे नाव दिले. यालाच पुरबाशा बेटही म्हणतात. या बेटावर मानवी वस्ती नाही परंतु या भागात असलेल्या तेल साठयांमुळे आणि मासेमारीच्या संधीमुळे दोन्ही देशांना या बेटावर ताबा मिळवण्यात रस आहे. १९७० सालच्या भोला चक्रीवादळामुळे या बेटाची निर्मिती झाली. १९७४ साली अमेरिकेच्या उपग्रहाने याचे अस्तित्व लक्षात आणून दिले. १९८१ मध्ये भारतीय नौदलाने येथे तिरंगा फडकावला. बांग्लादेशने याचा निषेध केला. १९९० साली हे बेट समुद्राच्या पाण्याची पातळी वाढल्यामुळे बुडाले. परंतु त्याच्या भोवतीचा प्रदेशासंबंधीचा वाद चालू राहिला. २०१४ साली आंतरराष्ट्रीय न्यायालयाने या बेटाची मालकी भारताची असल्याचे मान्य केले परंतु त्याच्या बाजूचा बराचसा प्रदेश बांग्लादेशला दिला. पर्यावरणात होणाऱ्या बदलांमुळे आणि जागतिक तापमानवाढीमुळे बंगालच्या उपसागरात आणि जगभरात इतरत्रही बेट बुडण्याचे आणि वर येण्याचे प्रकार नित्याचेच झाले आहेत.

**भारत बांग्लादेश सहकार्य:**

या सर्व वादाच्या पलिकडे जावून भारताने बांग्लादेशला बरेच सहकार्य केले आहे. तांदूळ आणि इतर अन्नधान्याचा मुबलक पुरवठा केला आहे. स्वस्त दरात कर्ज पुरवले आहे आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळेस सर्वप्रकारची मदतही केली आहे. भारताप्रमाणेच बांग्लादेशातही कबड्डी आणि क्रिकेट लोकप्रिय आहे. दोन्ही देशांच्या दरम्यान क्रिकेट आणि कबड्डीचे सामने होतात. वर उल्लेख केल्याप्रमाणे रेल्वे आणि बस सेवा सुरू करण्यात आल्या आहेत. दोन्ही देशांच्या नागरिकांना त्याचा फायदा होतो आहे. १९९६ साली गंगेच्या पाण्याच्या वाटपासंबंधी तीस वर्षाचा करार करण्यात आला आहे. भारत – पाकिस्तान – बांग्लादेश या तिन्ही देशातील नेत्यांमध्ये शिखर बैठका होत राहणे गरजेचे आहे. त्यामुळे बरेच गुंतागुंतीचे प्रश्न सुटू शकतात आणि गैरसमज दूर करून शांतता कायम राखण्यात मदत होवू शकते.

**समारोप:**

भारताने बांग्लादेशला स्वातंतत्र्योत्तर काळापासून ते आजपर्यंत वेळोवेळी मदत केलेली आहे. अलिकडे व्यापार, सुरक्षा, ऊर्जा, वाहतूक इत्यादि क्षेत्रामध्ये भारत – बांग्लादेश संबंधामध्ये प्रगती झालेली दिसते. बांग्लादेशकडून भारताला मोगल बंदराच्या वापराची परवानगी मिळाल्यामुळे भारताच्या पूर्वेकडील राज्यांसाठी समुद्री व्यापार अधिक सुलभ होईल. दोन्ही देशांनी आपल्यातिल विवादीत मुद्दे परस्पर सहकार्याने सोडवून बाहेरील आव्हानांना दोन्ही देशांनी मिळून तोंड द्यावे लागेल. वर्तमान स्थितीत बदलत्या दक्षिण आशियायी आणि जागतिक स्तरावरील बदलत्या राजकीय आणि आर्थिक परिप्रेक्षामध्ये दोन्ही राष्ट्रांचा क्षेत्रीय आर्थिक सहयोग खूप महत्वाचा ठरेल.

**संदर्भ:**

1. *आंतरराष्ट्रीय संबंध - हर्षद भोसले, शुभराज बुवा*
2. *भारत आणि जग (जून १९९५) – डॉ. शैलेन्द्र देवळाणकर*
3. *आंतरराष्ट्रीय संबंध – विस्वाल तपन*
4. *भारत की विदेशी नीती (२०१८) – सुमित गांगुली*
5. *समकालीन विश्व और भारत (२०१२) – अरुणोदय वाजपेई*